आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
१० जुलै २०२५ - गुरुवार

**ठळक बातम्या**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी पाच देशांच्या दौऱ्यावरून मायदेशी परतले

- बिगर-बँकिंग वित्तीय कंपन्यांच्या कर्ज वसुलीच्या पद्धती निष्पक्ष आणि सहानुभूतीपूर्ण पद्धतीने राबवायला हव्यात असं अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांचं प्रतिपादन

- शहापूर इथल्या शाळेत मासिक पाळी आलेल्या मुलींची चुकीच्या पद्धतीने तपासणी केल्याप्रकरणी कडक कारवाई करण्याचे मुख्यमंत्र्यांचे निर्देश

**आणि**

- अमेरिकेचा आठ देशांना नव्या दरानं आयातशुल्क आकारण्याचा निर्णय, येत्या १ ऑगस्टपासून नवे दर लागू होणार

**<><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी घाना, त्रिनिदाद आणि टोबॅगो, अर्जेंटिना, ब्राझील आणि नामिबिया या पाच देशांच्या दौऱ्यावरून आज नवी दिल्ली इथं परतले.  या भेटीदरम्यान, प्रधानमंत्री मोदी यांनी भारताबरोबरचे संबंध अधिक दृढ करण्याबाबत चर्चा करण्यासाठी या देशांच्या प्रमुखांशी संवाद साधला. रिओ दि जानेरो इथं  झालेल्या ब्रिक्स शिखर परिषदेलाही ते उपस्थित राहिले.

**<><><><>**

बिगर-बँकिंग वित्तीय कंपन्यांच्या कर्ज वसुलीच्या पद्धती निष्पक्ष, सहानुभूतीपूर्ण आणि आदरयुक्त पद्धतीने राबवल्या जायला हव्यात, आणि त्या भारतीय रिझर्व्ह बँकेच्या निष्पक्ष व्यवहार संहितेशी काटेकोरपणे सुसंगत असायला हव्यात, असं केंद्रीय अर्थमंत्री निर्मल सीतारामन यांनी म्हटलं आहे. त्या काल नवी दिल्ली इथं बिगर बँकिंग वित्तीय कंपन्यांच्या परिषदेला संबोधित करत होत्या. आर्थिक समावेशन हे आर्थिक शोषणाचं माध्यम म्हणून वापरलं जाऊ नये, असं त्या यावेळी म्हणाल्या.

कर्ज वितरण हे ग्राहकांच्या रास्त गरजा आणि कर्ज परतफेडीच्या क्षमतेवर आधारित असायला हवं यावर त्यांनी भर दिला. कर्जाचं आक्रमकपणे मार्केटिंग करून ते कोणावर लादलं जाऊ नये, तसंच व्याजदर वाजवी असायला हवा असं त्यांनी सांगितलं.

बिगर बँकिंग वित्तीय कंपन्यांनी आपल्या नीतिमत्तेचा भाग म्हणून प्रशासन, जोखीम व्यवस्थापन आणि ग्राहक संरक्षणाला महत्वाचं स्थान द्यायला हवं असं सीतारामन यांनी नमूद केलं.

**<><><><>**

गुरुपौर्णिमा आज साजरी होत आहे. अज्ञानातून ज्ञानाकडे घेऊन जाणाऱ्या गुरुजनांच्या चरणी कृतज्ञतेचं वंदन करण्याचा हा दिवस आहे. या निमित्तानं सर्वत्र गुरुपूजनासह विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना गुरुपौर्णिमेच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

**<><><><>**

राजधानी दिल्लीमध्ये आज सकाळी ४ पूर्णांक ४ रिक्टर स्केल क्षमतेचा भूकंपाचा धक्का बसला. भूकंपाचा केंद्रबिंदु हरियाणातल्या झज्जर इथं असल्याचं राष्ट्रीय भूकंप शास्त्र केंद्रानं सांगितलं आहे.

**<><><><>**

मुंबईत सिंदूर या उड्डाणपुलाचं लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्या हस्ते आज करण्यात आलं. दीडशे वर्षांपासून या पुलाला कर्नाक पूल म्हणून ओळखलं जायचं. कर्नाक हा ब्रिटीश गव्हर्नर भारतीयांना फसविणारा आणि अत्याचार करणारा असल्याने त्याच्या काळ्या इतिहासाच्या खुणा पुसण्यासाठी कर्नाक पुलाचे सिंदूर नामकरण केल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितलं. यावेळी माध्यमांशी बोलताना मुख्यमंत्री म्हणाले…

- **बाईट- देवेंद्र फडणवीस , मुख्यमंत्री -**

सिंदूर पूल हा मुंबईकरांना समर्पित असून आज दुपारी तीन वाजता हा पूल वाहतुकीसाठी खुला होईल, असंही त्यांनी सांगितलं.

**<><><><>**

शहापूर इथं एका शाळेत मुख्याध्यापकांनी मासिक पाळी आलेल्या मुलींची चुकीच्या पद्धतीने तपासणी केल्या प्रकरणी कडक कारवाई करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. मंत्री गिरीश महाजन यांनी आज विधानसभेत ही माहिती दिली. काँग्रेस आमदार नाना पटोले यांनी आज विधानसभेत हा मुद्दा उपस्थित केला. हे प्रकरण अतिशय गंभीर असून शासनाने याची दखल घ्यावी, असे निर्देश अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी दिले. मात्र, या मुख्याध्यापिकेला पदावरून काढून टाकण्याची मागणी आमदार जितेंद्र आव्हाड यांनी लावून धरल्यानं शासनानं याबाबत सभागृहात निवेदन करावं, असे निर्देश अध्यक्षांनी दिले.

जालना जिल्ह्यात सन २०२२ ते २०२४ या कालावधीत नैसर्गिक आपत्तीपोटी शेतकऱ्यांना देण्याच्या अनुदानात घोटाळा झाल्याचे आरोप अतिशय गंभीर स्वरूपाचे असून सर्व संबंधित अधिकाऱ्यांची विभागीय चौकशी विहित कालावधीत पूर्ण करू, जितके अधिकारी दोषी असतील त्यांना निलंबित करू, असं आश्वासन कृषी राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी आज विधानसभेत दिले. संतोष दानवे यांनी मांडलेल्या लक्षवेधी सूचनेला ते उत्तर देत होते.

**<><><><>**

मुंबई आणि महाराष्ट्रामध्ये सगळ्यात पहिला हक्क हा मराठी माणसाचा आहे, कुठेही मराठी माणसाचा हक्क डावलला जाणार नाही, अशी ग्वाही मंत्री शंभुराज देसाई यांनी विधान परिषदेत प्रश्नोत्तराच्या तासाला दिली. मराठी माणसाच्या हक्काचे रक्षण महायुती सरकार करेल, त्यामुळे एखाद्या ठिकाणी मराठी माणसाला घर नाकारलं जात असेल तर त्या बिल्डरवर निश्चित कारवाई केली जाईल, असंही देसाई यांनी सांगितलं. आमदार मिलिंद नार्वेकर यांनी तारांकित प्रश्नांद्वारे हा मुद्दा उपस्थित केला होता. मुंबईतील नवीन इमारतीत मराठी माणसांसाठी ५० टक्के घरांचे आरक्षण ठेवण्याबाबतचा कायदा करणार का, असा उपप्रश्न, आमदार अनिल परब, सचिन अहिर यांनी उपस्थित केला. यावेळी महाविकास आघाडी सरकारच्या, अडीच वर्षांच्या काळात असा कायदा का केला नाही, असा मुद्दा मंत्री शंभूराज देसाई यांनी मांडला. याला विरोधी पक्षाच्या आमदारांनी आक्षेप घेतला. यावेळी जोरदार खडाजंगी झाल्यानं सभागृहाचे कामकाज १० मिनिटांसाठी तहकूब करण्यात आलं. मुंबईतील नवीन इमारतीत, मराठी माणसांसाठी घरांचे ५० टक्के आरक्षण ठेवण्याबाबतचं

धोरण नक्की केलं जाईल, असं आश्वासन शंभूराज देसाई यांनी सभागृहाचं नियमित कामकाज सुरू झाल्यावर सभागृहाला दिलं.

**<><><><>**

राज्यात अंमली पदार्थांची तस्करी करणाऱ्यांवर एनडीपीएस कायद्यासोबतच मकोका अंतर्गत कारवाई करण्यासंदर्भातलं विधेयक विधानसभेनं काल एकमतानं मंजूर केलं. गृह राज्यमंत्री योगेश कदम यांनी याबाबतचा महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण (सुधारणा) अधिनियम, २०२५ काल सभागृहात मांडला. त्यावर विस्तृत चर्चा झाली. या चर्चेला उत्तर देताना, कदम यांनी व्यावसायिक पातळीवर अंमली पदार्थांची तस्करी करणाऱ्यांवर मकोका लावण्याची तरतूद या अधिनियमात असून यामुळे अंमली पदार्थांची साखळी तोडण्यात मोठी मदत होईल, अशी ग्वाही दिली. त्यानंतर विधानसभेनं एकमताने हे विधेयक संमत केलं. आज हे विधेयक विधानपरिषदेत मांडण्यात येईल.

**<><><><>**

गुजरातमध्ये बडोदा जिल्ह्यात पदर इथं काल एका  पुलाचा काही भाग महिसागर नदीत कोसळून झालेल्या दुर्घटनेतल्या मृतांची संख्या १२ झाली आहे. घटनास्थळी बचावकार्य अजूनही सुरू आहे. दरम्यान मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल यांनी घटनेच्या चौकशीचे आदेश दिले आहेत.

**<><><><>**

अमेरिकेनं आठ देशांना नव्या दरानं आयातशुल्क आकारण्याचा निर्णय घेतला असून ते येत्या १ ऑगस्ट पासून लागू होईल असं अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी घोषित केलं आहे. यामध्ये ब्राझील, श्रीलंका, अल्जेरिया, इराक, लिबिया, फिलीपिन्स, मोल्दोव्हा आणि ब्रुनेई या देशांचा समावेश आहे. ट्रम्प यांनी या देशांच्या सर्वोच्च नेत्यांना लिहिलेल्या पत्रात हे स्पष्ट केलं आहे. त्यानुसार ब्राझीलसाठी ५० टक्के इतका सर्वोच्च दर आकारला जाईल, श्रीलंका, इराक, अल्जेरिया आणि लिबिया या देशांमधून  आयात होणाऱ्या वस्तूंवर ३० टक्के, मोल्दोव्हा आणि ब्रुनेई यांना २५ टक्के, तर फिलीपिन्सला २० टक्के  आयातशुल्क आकारलं जाईल.

दरम्यान, या आठ देशांनी अमेरिकन उत्पादनांवर अधिक आयात शुल्क लागू करण्याचा निर्णय घेतला, तर तेवढ्याच प्रमाणात अमेरिका देखील आयात शुल्कात वाढ करेल, असा

इशारा या पत्रामधून दिला आहे. त्याच बरोबर, या देशांनी आपल्या व्यापार धोरणात सुधारणा केली, तर हे शुल्क कमी करण्याची अमेरिकेची तयारी असल्याचं ट्रम्प यांनी म्हटलं आहे.

दरम्यान, ट्रम्प यांनी घोषित केलेल्या नव्या आयात शुल्काविरोधात ब्राझीलचे अध्यक्ष लुला दा सिल्वा यांनी तीव्र प्रतिसाद नोंदवला असून, कोणत्याही प्रकारचं परकीय नियंत्रण खपवून घेतलं जाणार नाही, असं स्पष्ट केलं आहे.

<><><><>

अमेरिकेत, टेक्सासमध्ये आलेल्या महापुरात मृत्युमुखी पडलेल्यांचा आकडा १२० वर पोहोचला असून, एकट्या केरकाउंटीमध्ये, १५० पेक्षा जास्त नागरिक अद्याप बेपत्ता आहेत. नासा (NASA) नं आपल्या आपत्ती प्रतिसाद समन्वय प्रणालीचा भाग म्हणून, टेक्सासमधल्या बचाव कार्यासाठी दोन विमानं तैनात केली आहेत.

<><><><>

भारत आणि इंग्लंड महिला क्रिकेट संघांदरम्यान ब्रिटनमध्ये काल झालेल्या टी २० मालिकेच्या चौथ्या सामन्यात, भारतीय संघाने यजमान इंग्लंडचा सहा गडी राखून पराभव केला आणि पाच सामन्यांच्या मालिकेत ३-१ अशी आघाडी घेतली आहे. प्रथम फलंदाजी करताना इंग्लंडनं २० षटकांत ७ बाद १२६ धावा केल्या. प्रत्युत्तरादाखल, भारतीय संघाने केवळ १७ षटकांत चार गडी गमावून लक्ष्य पूर्ण केलं. सलामीवीर स्मृती मानधनाने ३२ धावा आणि शफाली वर्माने ३१ धावांचं योगदान दिलं.

//<><><><>//